(४५७)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स -II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोनिआ/ ६२८ /२०२३
दिनांक : 02/08/२०२३.

## झोपडपट्टी निर्मुलन आदेश (पुर्वसूचना)
## महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ड अन्वये पुर्वसूचना .

प्रस्तावना -

(१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

(२) या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

(३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव मौजे निगडी, स.नं.६५पै, ६७पै, निगडी व ७७पै (नवीन स.नं. ५१ ब पै), ८६पै, आकुर्डी, येथील दुर्गानगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे क्षेत्रफळ ७८०४.३६ चौ.मी. या क्षेत्रावर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.रेन्बो डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर एल.एल.पी यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला असून सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच, विकसक यांनी दि.३०/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये ३ (ड) करणेबाबत विनंती केली आहे.

(४) सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) दि.२९/०७/२०२१ रोजी तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट -२ नुसार सदर मिळकतीवर एकूण ३५५ झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र २६८, अपात्र ५४ व बिगर निवासी पात्र ३, अपात्र २७ आणि संयुक्त ३ पैकी निवासी पात्र बिगरनिवासी अपात्र २ या प्रमाणे एकुण २७३ झोपडीधारक मोफत पुनर्वसनास पात्र ठरले आहेत तसेच सशुल्क पुनर्वसनाकरीता ३७ झोपडीधारक पात्र ठरले आहेत, असे एकूण ३१० झोपडीधारक पात्र ठरले आहेत.;

(५) सदर मिळकतीकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश दि.१४/०७/२०२१ रोजी पारित करणेत आला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, जुलै २९ ते ऑगस्ट ४, २०२१ मध्ये पृष्ठ क्र. ३ व ४ तसेच महाराष्ट्र निरोप्या व दैनिक समाचार या दैनिक वृत्तपत्रात दि.१७/०७/२०२१ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे. तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.१९/०७/२०२१ रोजी डकविण्यात आलेला आहे.

(६) उक्त झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र अंतिम आदेशास मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही आणि म्हणून, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती / झोपडया पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे;

(७) विकसक मे.रेन्बो डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर एल.एल.पी यांचेमार्फत मौजे निगडी येथील स.नं.६५पै, ६७पै, व मौजे आकुर्डी येथील ७७पै (नवीन स.नं. ५१ ब पै), ८६पै, (दुर्गानगर) येथील बांधकाम आयोग्य (Non Buildable) जागेवरील झोपडीधारकांचे पुनर्वसन प्राधिकरणाकडील विशेष नियमावलीतील नियम क्र.२० नुसार स.नं.५६पै, ५७ पै, ६३ पै, शरदनगर, निगडी येथील मिळकतीवरती कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात येणार आहे.

(८) <u>सदर क्षेत्रातील सर्व झोपडीधारकांना प्रस्तुत आदेशाद्वारे खालीलप्रमाणे कळवित येत आहे,</u>

a) सदर क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकामामधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसक यांचे ताब्यात द्यावी.

b) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन मोकळी करावी.

c) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यास राहतील.

d) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास अथवा झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास अथवा झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून निष्कासनाच्या कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

e) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोषसिद्धीअंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

<u>आदेश</u> :-

(१) मी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ड मधील तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे व्यथित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये सदरचा आदेश कायम करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर

मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

**झोपडपट्टीचे नाव** :- **स.नं.६५पै, ६७पै, निगडी व ७७पै (नवीन स.नं. ५१ ब पै), ८६पै, आकुर्डी, दुर्गानगर झोपडपट्टी**

**महानगरपालिकेचे नाव :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**अनुसूची**

| गाव | स.नं. | जमीनीचे मालक/भोगवटादार | क्षेत्र ( चौ. मी.) पूर्णत: | चतु:सिमा | विकसकाचे नाव व शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मौजे निगडी | ६५ (पै), ६७ (पै) | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण | ७८०४.३६ चौ.मी. | **पुर्व** – आंबेडकरनगर झोपडपट्टी व मोकळी जागा, | मे.रेन्बो डेव्हलपर्स अँण्ड प्रमोटर एल.एल.पी ७०१ प्राईड पर्पल आकॉर्ड बिल्डींग, बाणेर, पुणे - ४५. |
| मौजे आकुर्डी | ७७पै ( नवीन स.नं.५१ ब पै) | बजाज ऑटो कंपनी लिमिटेड | | **दक्षिणेस** – बजाज कंपनी | |
| | ८६ (पै) | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | | **पश्चिमेस** – यमुनानगर निगडी व रस्ता | |
| | | | | **उत्तरेस** – चिंचवड आकुर्डी, लिंक रोड | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

(नीलेश र. गटणे), (भा.प्र.से.)
2.8.2023
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.**

**स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.**
**दिनांक :-** 02 /08 /२०२३

**प्रत :-**

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
२. अ) मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
   ब) उपआयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, झोनिपु विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३. जमिन मालक -
   अ) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, नविन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ, आकुर्डी, पुणे-४४ - यांना माहितीस्तव सादर.
   ब) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे -१९- यांना माहितीस्तव सादर.
   क) बजाज ॲटो कंपनी लिमिटेड, जुना मुंबई - पुणे हावये, मेन रोड, आकुर्डी, पुणे -३५ - यांना माहितीस्तव सादर.
४. मे.रेन्बो डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर एल.एल.पी, ७०१ प्राईड पर्पल आकॉर्ड बिल्डींग, बाणेर, पुणे.